**कृपया प्रसिध्दीसाठी** **20 एप्रिल 2009**

# राम नाईक यांच्या प्रचारसाठी अभिनेता श्री. मनोज जोशी

**मुंबई, सोमवार:** भाजपा नेते व भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील उमेदवार श्री. राम नाईक यांच्या प्रचारासाठी गुजराती व मराठीतील लोकप्रिय अभिनेता श्री. मनोज जोशी ही उत्तर मुंबई मध्ये आले होते. "मतदारांनी राम नाईक यांचे काम पाहून त्यांना मतदान करावे, तेच उत्तर मुंबईचे खरेखुरे प्रतिनिधीत्व करु शकतील" असे आवाहन मालाड येथिल प्रचारफेरीमध्ये श्री. जोशी यांनी मतदारांना केले.

दप्तरी रोड येथून सुरु झालेल्या प्रचारफेरीत मोठया प्रमाणावर नागरिक आणि कार्यकर्ते सामिल झाले होते या सर्वांच्याच उत्साहाला श्री. मनोज जोशी यांच्या उपस्थितीमुळे उधाण आले. त्यातच मालाड मच्छिमार मार्केट जवळ प्रचारफेरी पोहोचल्यानंतर बाजारातील कोळीणी आणि मच्छिमार समाजाच्या अन्य महिलाही उत्स्फूर्तपणे प्रचार फेरीत सामिल झाल्या. पुढे राणी सती मार्गावरुन खांडवाला लेन, दत्त मंदिर रोड, हरिनगर, बाण डोंगरी, बोहराणी मार्ग, पुष्पा पार्क रोड क्र. १,२, ३, प्रतापनगर, सर्विस रोड, खोतकुआ रोड, जय भवानी मार्ग, बच्चानी नगर, हिरा मार्केट, आदी परिसरात परिवर्तन रथावरुन श्री. राम नाईक आणि श्री. मनोज जोशी यांनी प्रचार केला. या प्रचारयात्रे मध्ये सामिल झालेल्या महिलांच्या आणि कार्यकर्त्यांच्या उत्साहास तोडीस तोड असा प्रतिसाद स्थानिक नागरिक ही देत होते. यावेळी बोलताना श्री. राम नाईक म्हणाले, "निवडून आल्यानंतर मच्छिमारांना त्यांच्या बोटींसाठी डिझेलवर मिळणारी सवलत काँग्रेस सरकारने बंद केली आहे ती पुन्हा सुरु करण्याला माझी प्राथमिकता राहील. त्याचप्रमाणे मच्छिमार मत्स्यशेती करतात म्हणूनच त्यांनाही शेतकऱ्यांप्रमाणेच चार टक्के दराने कर्ज मिळवून देण्याचा माझा प्रयत्न राहील."

सदर प्रचारयात्रेमध्ये भाजपा नगरसेवकद्वय डॉ. राम बारोट व ॲड.श्री. ज्ञानमुर्ति शर्मा, तसेच भाजपा शिवसेना नेते सर्वश्री विनोद शेलार, अतुल भातखळकर, जगदीश पटेल, श्रीमती दक्षा पटेल, श्री. गणपत सावंत आदीही सामिल झाले होते.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**